**संदर्भ क्र.सुरमं**/अध्यक्ष/२०१७-७१८८

**सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा**
डी-३०१/इ-३०१, सानपाडा रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स,
सानपाडा, नवी मुंबई - ४०० ७०५.
दूर.०२२-२७७५१३८५/८६,फॅक्स क्र.०२२-२७७५१३८७

दिनांक : १७ ऑक्टोबर, २०१७

## आ दे श

**विषय :- सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे वेतन व भत्त्यांमध्ये दि.०१ जून, २०१७ पासून सुधारणा करणेबाबत.**

सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते निश्चित करण्याबाबत, खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना (सुधारीत) २००२ मधील खंड ३० मधील तरतुदीनुसार मंडळास अधिकार प्रदान करण्यांत आले आहेत. सुरक्षा रक्षकांचे वेतन निश्चित करण्यासाठी मंडळाने किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत "दुकाने व व्यापारी आस्थापना" मधील कामगारांना लागू असलेले किमान वेतनाचे दर हे आधारभूत प्रमाण मानण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यानुसार सदर अनुसूचित उद्योगधंद्यामधील कामगारांसाठी शासनातर्फे वेळोवेळी जाहीर होणारा विशेष भत्ता मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांना अदा करण्यांत येतो. त्याचप्रमाणे सुरक्षा रक्षकांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या सुरक्षा रक्षक संघटनांनी केलेल्या मागणीनुसार सुरक्षा रक्षकांच्या वेतनात वेळोवेळी वाढ करण्यांत आलेली आहे. मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांचे सध्याचे एकूण वेतन रु.१३,३७२.२० इतके आहे.

मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते यामध्ये वाढ करणेसाठी विविध सुरक्षा रक्षक संघटनांनी निवेदनाद्वारे केलेल्या मागणीसंदर्भात, मंडळाने महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना (सुधारीत) २००२ मधील खंड ३० चे उपखंड (२) मधील तरतूदीनुसार, मंडळाने दि. ०३.०६.२०१७ रोजी महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, मुंबई सकाळ, इंडीयन एक्सप्रेस या दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिर सूचना प्रसिध्द करुन सुरक्षा रक्षकांची प्रस्तावित वेतनवाढ जाहीर केलेली होती. व सदर जाहीर सूचनेद्वारे बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा कार्यक्षेत्रामधील मुख्य मालकांच्या विविध संघटना/असोसिएशन्स व सुरक्षा रक्षक आणि त्यांच्या कामगार संघटना यांना सदर जाहीर सूचनेमधील प्रस्तावित केलेल्या वेतनवाढीबाबत आपल्या काही सूचना व हरकती असल्यास मंडळास सात दिवसांच्या आत सादर करण्याचे आवाहन करण्यातं आले होते.

तथापि, मुख्य मालकांच्या कोणत्याही संघटना/असोसिएशन यांनी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केलेल्या उपरोक्त जाहीर सुचनेस अनुसरुन कोणतेही निवेदन/प्रस्ताव मंडळाकडे सादर केलेले नाही. तसेच मुख्य मालक/प्रमुख नियोक्ता व सुरक्षा रक्षक संघटना यांनी मंडळास प्रस्तावित केलेल्या वेतनवाढीच्या अनुषंगाने आपल्या सुचना व हरकती विचारात घेऊन मंडळातील सुरक्षा रक्षकांना सुधारीत वेतनवाढ माहे जून २०१७ पासून पुढील तीन वर्षाकरीता करण्याबाबत मंडळाने शासनाकडे दि. १२.७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित केले होते.

सदर प्रस्तावास अनुसरुन शासनाने मंडळातील सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्त्याच्या वाढीबाबत मंडळास शासन पत्र क्र.२०१७/प्र.क्र.३४३/काम-५, दि.१६.१०.२०१७ अन्वये निर्देशित करण्यांत आले आहे की, सुरक्षा रक्षकांच्या माहे जून २०१७ पासूनच्या वेतनवाढीबाबत महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व

...२

खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना २००२ च्या तरतूदीनुसार व यासंदर्भातील सर्व कायद्यानुसार व विषयानुसार काटेकोरपणे कारवाई करण्यास मान्यता देण्यात येत आहे. शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत मंडळाने दि. १७.१०.२०१७ रोजी एकसदस्यीय मंडळामध्ये ठरावाद्वारे निर्णय घेतला असून सुधारीत वेतन व भत्ते माहे **जून २०१७ पासून पुढील तीन वर्षाकरीता (दि.१ जून २०१७ ते दि.३१ मे २०२०)** खालीलप्रमाणे निश्चित करण्यांत आलेले आहेत.

१) <u>मूळ वेतन</u> :

| अनु.क्र. | हुद्दा | सुधारीत मूळ वेतनाचे दर |
|---|---|---|
| १. | सुरक्षा रक्षक/महिला सुरक्षा रक्षक | रु.७,६००.०० |
| २. | मुख्य सुरक्षा रक्षक | रु.७,८७५.०० |
| ३. | सुरक्षा पर्यवेक्षक | रु.८,५७५.०० |
| ४. | सहाय्यक सुरक्षा अधिकारी | रु.८,८००.०० |
| ५. | सुरक्षा अधिकारी | रु.९,२५०.०० |
| ६. | मुख्य सुरक्षा अधिकारी | रु.९,७००.०० |

सदरचे दर दि.१ जून, २०१७ पासून सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्हा या मंडळाच्या कार्यक्षेत्रात लागू असतील.

२) **<u>विशेष भत्ता (महागाई भत्ता)</u> :** मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना किमान वेतन अधिनियम, १९४८ मधील "दुकाने व व्यापारी संस्था" अनुसूचित रोजगारासाठी लागू असलेला महागाई भत्ता लागू राहील.

सक्षम प्राधिकारी यांचे कडून किमान वेतन अधिनियम, १९४८ अन्वये विशेष महागाई भत्त्यामध्ये दि.१ जुलै २०१७ ते दि.३१ डिसेंबर २०१७ या कालावधीकरीतां कोणताही बदल न झाल्यामुळे सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम १९४८ मुंबई यांचे क्र.ग्रा.वि./विवेअ/वि.भ.-२/२०१७/कार्या-१०, दि.४.२.२०१७ रोजीचे आदेश कायम ठेऊन **दि.१ जुलै २०१७ ते दि.३१ डिसेंबर २०१७ या कालावधी करीतां विशेष भत्ता/महागाई भत्त्याचा दर रु.३,२५६.२० दरमहा** इतका निश्चित करण्यांत आला आहे.

३) **<u>घरभाडे भत्ता</u> :** उपरोक्त किमान वेतनाशिवाय (मूळ वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता मिळून) मंडळाच्या नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकाऱ्यांना त्यांचे किमान वेतनावर २०% दराने दरमहा घरभाडे भत्ता देय राहील.

४) **<u>प्रवास भत्ता</u> :** सर्व नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकाऱ्यांना रु.९००.०० ऐवजी रु.१,५००.०० दरमहा इतका प्रवास भत्ता लागू करण्यांत आलेला आहे.

५) **<u>धुलाई भत्ता</u> :** सर्व नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना रु.५००.०० ऐवजी रु.६००.०० दरमहा इतका धुलाई भत्ता लागू करण्यांत आलेला आहे.

६) **<u>शैक्षणिक भत्ता</u> :** सर्व नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना रु.८००.०० ऐवजी रु.१,३००.०० दरमहा इतका शैक्षणिक भत्ता लागू करण्यांत आलेला आहे.

७) **रजाकालीन प्रवास भत्ता** : सर्व नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना आपल्या मूळ गांवी जाण्यासाठी रजाकालीन प्रवासभत्ता रु.१००/- दरमहा इतका नव्याने लागू करण्यांत आला आहे.

८) सुरक्षा रक्षकांना निश्चित केलेले वेतन व भत्ते हे ८ तासांच्या कामासाठी असून अतिकालीन कामाचा मोबदला किमान वेतनाच्या (मूळ वेतन + विशेष भत्ता) दुप्पट दराने देय राहील.

९) लेव्हीच्या दरात अथवा संरचनेत कोणताही बदल केलेला नसून लेव्हीचे दर पुर्वीप्रमाणेच राहतील. त्याचप्रमाणे, सुरक्षा रक्षकांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता) ४६.७५ टक्के दराने लेव्ही आणि घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता, शैक्षणिक भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व अतिकालीन कामाचे वेतन यावर ४.७५ टक्के लेव्ही देय राहील.

**सुरक्षा रक्षकांना दि.१ जून २०१७ ते दि.३१ मे २०२० पर्यंत लागू करण्यांत आलेले सुधारीत वेतन व भत्ते (रुपयांत)**

| अ. क्र. | सुरक्षा रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता २० टक्के प्रमाणे | प्रवास भत्ता | शैक्षणिक भत्ता | रजाकालीन प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते | लेव्ही (मूळ वेतनाच्या @४६.७५ %) रुपये | लेव्ही (घरभाडे, प्रवास भत्ता, रजाकालीन प्रवासभत्ता व शैक्षणिक भत्त्यावर @ ४.७५%) रु | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक /महिला सु.र. | ७,६००.०० | ३,२५६.२० | २,१७१.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | १६,५२७.२० | ५,०७५.०० | २४१.०० | २१,८४३.२ |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | ७,८७५.०० | ३,२५६.२० | २,२२६.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | १६,८५७.२० | ५,२०४.०० | २४३.०० | २२,३०४.२ |
| ३ | सुरक्षा पर्यवेक्षक | ८,५७५.०० | ३,२५६.२० | २,३६६.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | १७,६९७.२० | ५,५३१.०० | २५१.०० | २३,४७९.२ |
| ४ | सहा.सु. अधिकारी | ८,८००.०० | ३,२५६.२० | २,४११.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | १७,९६७.२० | ५,६३६.०० | २५३.०० | २३,८५६.२ |
| ५ | सुरक्षा अधिकारी | ९,२५०.०० | ३,२५६.२० | २,५०१.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | १८,५०७.२० | ५,८४६.०० | २५७.०० | २४,६१०.२ |
| ६ | मुख्य सुरक्षा अधिकारी | ९,७००.०० | ३,२५६.२० | २,५९१.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | १९,०४७.२० | ६,०५७.०० | २६१.०० | २५,३६५.२ |

* **किमान वेतन = मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता**

सबब, मंडळातील सर्व नोंदीत मुख्य मालकांना निर्देशीत करण्यांत येते की, वितरीत केलेल्या सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार माहे जून २०१७ पासून सुधारीत दराने वेतन व लेव्ही, फरकासह मंडळास अदा करण्यात यावी.

Security Guards Board For Br. Bombay & Thane District
Sanpada
Navi Mumbai

(राजेश भा. आडे)
**सहाय्यक कामगार आयुक्त व**
**अध्यक्ष**
सुरक्षा रक्षक मंडळ
बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा

प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :

..................................................................

..................................................................

*This being a computerized printed copy, signature is not required.*